महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दिनांक:- ०५ फेब्रुवारी, २०२५

# जाहिरात

**विषय:-** महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधिकरणाच्या मुख्य खंडपीठ बृहन्मुंबई, खंडपीठ पुणे, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर व खंडपीठ नागपूर येथील रिक्त असलेल्या किंवा संभाव्य रिक्त होणाऱ्या अध्यक्ष, सदस्य (न्यायिक व प्रशासकीय) या पदांवरील नियुक्त्या करणेबाबत.

**०१.** महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधिकरणाची स्थापना केली आहे. न्यायाधिकरणाचे कामकाज हे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व त्या अंतर्गत कलम ३१९ नुसार तयार करण्यात आलेल्या २०१३ च्या नियमनानुसार केले जाते. महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधिकरण नियम, २०२५ नुसार सदर न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष, सदस्य (न्यायिक व प्रशासकीय) या पदांकरिताच्या अर्हता, पदाची मुदत व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती तसेच त्यांच्या नियुक्तीची प्रक्रिया निश्चित केलेली आहे. न्यायाधिकरणाचे मुख्य खंडपीठ बृहन्मुंबई येथे असुन पुणे, छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथे इतर खंडपीठे आहेत. मुख्य खंडपीठ बृहन्मुंबई येथे अध्यक्ष, एक सदस्य न्यायिक व एक सदस्य प्रशासकीय तर इतर प्रत्येक खंडपीठांकरिता एक सदस्य न्यायिक व एक सदस्य प्रशासकीय याप्रमाणे पदसंख्या आहे.

**०२. पदे भरण्यासाठी उपलब्ध असलेल्या / उपलब्ध होणाऱ्या रिक्त पदांचा तपशील-**

| मुख्यपीठ / खंडपीठ नांव | पदांचा तपशिल | पदाची सद्यस्थिती |
|---|---|---|
| महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, **बृहन्मुंबई.** | अध्यक्ष | संभाव्य रिक्त होणारे |
| | सदस्य (न्यायिक) | **रिक्त** |
| | सदस्य (प्रशासकीय) | **रिक्त** |
| महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, **पुणे.** | सदस्य (न्यायिक) | **रिक्त** |
| | सदस्य (प्रशासकीय) | संभाव्य रिक्त होणारे |
| महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, **छत्रपती संभाजी नगर.** | सदस्य (न्यायिक) | संभाव्य रिक्त होणारे |
| | सदस्य (प्रशासकीय) | **रिक्त** |
| महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, **नागपूर.** | सदस्य (न्यायिक) | **रिक्त** |
| | सदस्य (प्रशासकीय) | संभाव्य रिक्त होणारे |

०३. महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधिकरणाचे अध्यक्ष, सदस्य (न्यायिक व प्रशासकीय)यांच्या अर्हता, त्यांच्या पदाची मुदत, सेवेच्या अटी व शर्ती, तसेच नियुक्तीची प्रक्रिया ही महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधिकरण नियम, २०२५ मध्ये नमूद केल्यानुसार असेल.

०४. वेतन, भत्ते व इतर सेवाशर्ती या पुढील शासन निर्णयांमधील तरतुदींप्रमाणे असतील:-

०१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक- एमआरटी १००७/प्र.क्र.८९/टी-१, दि. ०१/०२/२००८,

०२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक- एमआरटी १००७/प्र.क्र.८९/टी-१, दि. १७/०३/२०१२,

०३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक- एमआरटी २०१३/प्र.क्र.२३६/टी-१, दि.३०/०३/२०१६.

०५. येथे यापूर्वी नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार, महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधिकरणाच्या उक्त नमूद केल्यानुसार रिक्त असलेल्या किंवा संभाव्य रिक्त होणाऱ्या अध्यक्ष, सदस्य (न्यायिक व प्रशासकीय)या पदांवरील नियुक्तीसाठी पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी कोणत्याही एका रिक्त पदासाठी एक अर्ज याप्रमाणे त्यांचा तपशिल सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्र व जोडपत्रात भरुन बंद लिफाफ्यात सादर करावा. लिफाफ्यावर "महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधिकरण, अध्यक्ष / सदस्य न्यायिक / सदस्य प्रशासकीय) पदासाठी अर्ज" असे लिहून पोस्टाने उप सचिव, कार्यासन ज-१अ, महसूल व वन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ किंवा j1a.revenue@maharashtra.gov.in या ई-मेल पत्त्यावर ई-मेलद्वारे शुक्रवार दिनांक ०७/०३/२०२५ रोजी दु. ०२:०० वाजेपर्यंत पोहचतील अशाप्रकारे पाठवावेत.

०६. राज्य/केंद्र शासन किंवा अन्य कोणत्याही संघटनेत सेवेत असलेल्या व्यक्तींनी त्यांचा तपशील विहित मार्गाने (प्रशासकीय मंत्रालय/ विभाग /राज्य / केंद्रशासित प्रदेश यांचे मार्फत) अंतिम दिनांकापूर्वी पाठवावा.

(संजय धारुरकर)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

**प्रपत्र**

महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधिकरणावरील रिक्त असलेले किंवा संभाव्य रिक्त होणारे अध्यक्ष, (सदस्य न्यायिक व प्रशासकीय) या पदांच्या विचारार्थ पाठवावयाच्या तपशिलांचे प्रपत्र.

**फोटो**

इच्छुक पदाचा तपशील : खंडपीठ व पद (कोणतेही एक खंडपीठ व पद नमूद करावे)

१. नाव मराठी :

इंग्रजी (कॅपिटल) :

२. जन्मदिनांक :

३. सध्याचा पत्ता :

४. संपर्क क्रमांक :

५. ई-मेल :

६. शैक्षणिक अर्हता :

७. अर्हता धारण केलेले पद :

८. अर्हता धारण केलेल्या पदावरील कामाचा तपशील (जोडपत्रा प्रमाणे) :

९. सध्याचा व्यवसाय :

**दिनांक :**
**ठिकाण :**

**सही**
**(उमेदवाराचे संपूर्ण नाव)**

## जोडपत्र

| अ.क्र. | पद | कार्यालय / न्यायालय | कालावधी | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक २०(२)] मंगळवार, फेब्रुवारी ४, २०२५/माघ १५, शके १९४६ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक एमआरटी-२०२४/प्र.क्र.१११/ज-१अ.—उक्त संहितेच्या कलम ३२५ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि महाराष्ट्र जमीन महसूल (महसूल न्यायाधिकरण) नियम, २००७ चे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियम तयार करीत असून ते, उक्त संहितेच्या कलम ३२९ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत :—

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांस, " महाराष्ट्र जमीन महसूल (महसूल न्यायाधिकरण) नियम, २०२५" असे म्हणावे.

२. **व्याख्या.**—(१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) "संहिता" याचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा.४१), असा आहे ;

(ख) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ग) "सदस्य" याचा अर्थ, न्यायाधिकरणाचा सदस्य, असा आहे.

(२) या नियमांमध्ये वापरलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व संज्ञा यांना, अनुक्रमे, या संहितेन्वये जे अर्थ नेमून दिलेले आहेत तेच अर्थ असतील.

३. **न्यायाधिकरणाचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्या अर्हता.**—(१) अध्यक्ष हा, अशी व्यक्ती असेल की,—

(एक) जो उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा राहिलेली आहे ; किंवा

(दोन) जिने पाच वर्षांपेक्षा कमी नसेल अशा कालावधीसाठी,

(क) सचिव, विधि व न्याय विभाग,

(ख) मुंबई शहर दिवाणी न्यायालय, मुंबईचा मुख्य न्यायाधिश,

(ग) जिल्हा न्यायाधीश, किंवा

(घ) सदस्य

हे पद धारण केलेले असेल, किंवा यथास्थित, या पदाच्या अधिकारांचा वापर केला असेल,

(२) सदस्य हा, अशी व्यक्ती असेल की, जी,—

(एक) जिल्हाधिकारी, किंवा

(दोन) जिल्हा न्यायाधीश,

याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल असे पद धारण करीत आहे किंवा धारण केलेले असेल.

**४. न्यायाधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या पदाची मुदत व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.—**

(१) न्यायाधिकरणाचे अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तीचे वय, नियुक्तीच्या वेळी बासष्ट वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

(२) अध्यक्ष व सदस्य, राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा, तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी पद धारण करतील.

(३) ज्या व्यक्तीने, पोट-नियम (२) मध्ये नमूद केलेल्या मुदतीसाठी, अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून पद धारण केलेले असेल अशी व्यक्ती पुनर्नियुक्तीसाठी पात्र असेल.

(४) अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, पासष्ट वर्षे वयाची झाल्यानंतर, अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून पद धारण करणार नाही.

(५) अध्यक्षास किंवा कोणत्याही सदस्यास, स्वतःच्या सहीनीशी राज्य शासनाला उद्देशून, कोणत्याही वेळी, लेखी स्वरुपात, आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि त्याचा राजीनामा, ज्या तारखेस स्वीकारण्यात येईल त्या तारखेपासून अंमलात येईल.

(६) या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जर शासनाचे , असा अध्यक्ष किंवा सदस्य, त्याच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ किंवा अपात्र आहेत असे मत असेल तर, शासनास, अशा अध्यक्षाची किंवा कोणत्याही सदस्याची नियुक्ती, कोणत्याही वेळी समाप्त करता येईल.

**५. न्यायाधिकरणाचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्या नियुक्तीची प्रक्रिया.—**

(१) शासन, अध्यक्ष व सदस्य यांची रिक्त पदे भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रकाशित करून अर्ज मागवील.

(२) (क) अध्यक्ष व न्यायिक सदस्य यांच्या पदाच्या नियुक्तीसाठी एक निवड समिती असेल, तिच्यामध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) मुख्य सचिव-अध्यक्ष ;

(दोन) प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग-सदस्य ; आणि

(तीन ) प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग-सदस्य सचिव.

(ख) प्रशासकीय सदस्याच्या पदाच्या नियुक्तीसाठी एक निवड समिती असेल, तिच्यामध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) मुख्य सचिव-अध्यक्ष;

(दोन) प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग-सदस्य; आणि

(तीन) प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग-सदस्य सचिव.

(३) निवड समिती, शासनाला प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करील आणि अध्यक्ष, किंवा यथास्थिति, सदस्य पदासाठी प्रत्येकी तीन नावांची शिफारस करील.

(४) शासन, निवड समितीने शिफारस केलेल्या नावांपैकी एका उमेदवाराची, अध्यक्ष किंवा यथास्थिति, सदस्य या पदावर नियुक्ती करील.

(५) या नियमात अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीसाठी विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती, अध्यक्ष किंवा यथास्थिति, सदस्य यांच्या पुनर्नियुक्तीच्या बाबतीत देखील अनुसरण्यात यईल.

**६. न्यायाधिकरणाचे प्रबंधक व उप प्रबंधक यांच्या अर्हता.—**

(१) प्रबंधक हा, सहाय्यक जिल्हाधिकारी किंवा उप जिल्हाधिकारी याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला महसूल अधिकारी असेल.

(२) उप प्रबंधक हा, तहसीलदार याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला महसूल अधिकारी असेल.

**७. बृहन्मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर व नागपूरच्या बाहेर न्यायाधिकरणाच्या बैठकीबाबत नोटीस.—**बृहन्मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर व नागपूरच्या बाहेरील न्यायाधिकरणाच्या बैठकीबाबत पुरेशी नोटीस, न्यायाधिकरणाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करून, आणि संहितेच्या कलम ३१९ अन्वये अध्यक्षाने केलेल्या विनियमांमध्ये निर्धारीत करण्यात येईल अशा अन्य रितीने देण्यात येईल.

**८. सुनावणीची नोटीस.—**प्रबंधक किंवा उप प्रबंधक, अपीले व पुनरिक्षण अर्ज यांच्या सुनावणीसाठी, न्यायाधिकरणाच्या बैठकीची व्यवस्था करील आणि तो, त्याच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या तारखा, न्यायाधिकरणाच्या सूचना फलकावर पुरेशा आधी प्रसिद्ध करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय धारुरकर,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 4th February 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE,1966.

No. MRT -2024/C.R.111/J-1A.—In exercise of the powers conferred by section 325 of the said Code, and of all other powers enabling it in that behalf, and in supersession of the Maharashtra Land Revenue (Revenue Tribunal) Rules, 2007, the Government of Maharashtra hereby, makes the following rules, the same having been previously published as required by sub-section (*i*) of section 329 of the said Code, namely :—

**1.** *Short title.*—These rules may be called the Maharashtra Land Revenue Tribunal Rules, 2025.

**2.** *Definitions*.—(*1*) In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) "Code" means the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) ;

(*b*) "Government" means the Government of Maharashtra;

(*c*) "member" means a member of the Tribunal.

(*2*) Words and expressions used but not defined in these rules shall have the same meanings as are respectively assigned to them under the Code.

**3.** *Qualifications of President and Members of Tribunal*.—

(*1*) The President shall be a person,—

(*i*) who is or has been a Judge of a High Court, or

(*ii*) who has for a period of not less than five years held the office, or as the case may be, exercised the powers of,—

(*a*) the Secretary, Law and Judiciary Department,

(*b*) the Principal Judge of the City Civil Court, Mumbai,

(*c*) a District Judge, or

(*d*) a member.

(*2*) A member shall be a person, who is holding or has held an office not lower in rank than of,—

(*i*) a Collector, or

(*ii*) a District Judge.

**4.** *Period of office and terms and conditions of service of President and Members of Tribunal.*—

(*1*) The age of the person to be appointed as the President or the member of the Tribunal shall not be more than sixty two years at the time of appointment.

(*2*) The President and the members shall hold office for such period not exceeding three years as may be specified by the State Government.

(*3*) A person who has held office as a President or a member for the period mentioned in sub-rule (*2*) shall be eligible for re-appointment.

(*4*) The person appointed as the President or the member shall not hold the office as the President or member, after attaining the age of sixty five years.

(*5*) The President or any member may at any time resign his office by writing under his hand addressed to the Government and his resignation shall take effect from the date on which it is accepted.

(*6*) Notwithstanding anything contained in this rule, the Government may at any time terminate the appointment of the President or any member, if in its opinion, such President or member is unable or unfit to continue to perform the duties of his office.

**5.** *Procedure for appointment of President and Members of the Tribunal.*—(*1*) The Government shall call for applications by publishing an advertisement in the newspaper for filling up the vacancies for the post of President and members.

(*2*) (*a*) There shall be a Selection Committee for the appointment to the post of the President and Judicial member which shall consist of the following members, namely :—

(*i*) the Chief Secretary—Chairman;

(*ii*) the Principal Secretary, Law and Judiciary Department—Member ; and

(*iii*) the Principal Secretary (Revenue), Revenue and Forest DepartmentM—ember Secretary.

(*b*) There shall be a Selection Committee for the appointment to the post of the administrative member which shall consist of the following members, namely :—

(*i*) the Chief Secretary - Chairman;

(*ii*) the Principal Secretary (Services), General Administration Department - Member; and

(*iii*) the Principal Secretary (Revenue), Revenue and Forest Department – Member Secretary.

(*3*) The Selection Committee shall scrutinize the applications received by the Government and recommend three names for the appointment to the post of President or member each, as the case may be.

(*4*) The Government shall appoint one of the candidates from the names recommended by the Selection Committee to the post of President or member, as the case may be.

(*5*) The procedure specified for appointment of President and member in this rule shall also be followed in case of reappointment of President or the member, as the case may be.

**6.** *Qualification of Registrar and Deputy Registrar of the Tribunal.*—(*1*) The Registrar shall be a Revenue Officer not below the rank of Assistant Collector or Deputy Collector.

(*2*) The Deputy Registrar shall be a Revenue Officer not below the rank of Tahsildar.

**7.** *Notice about Tribunal's sitting outside Greater Mumbai, Pune, Chhatrapati Sambhajinagar and Nagpur*.—Sufficient notice about the sitting of Tribunal outside Brihan Mumbai, Pune, Chhatrapati Sambhajinagar and Nagpur shall be given by publication on the notice board of the Tribunal and in such other manner as may be laid down in the regulations made by the President under section 319 of the Code.

**8.** *Notice of Hearing.*—The Registrar or the Deputy Registrar shall arrange for the sitting of the Tribunal for hearing the appeals and applications for revision and publish the dates fixed for the hearing thereof on the notice board of the Tribunal sufficiently in advance.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY DHARURKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

**<u>महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण</u>**
**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या**
**अध्यक्ष व सदस्यांच्या सेवाशर्तीबाबत..**

**महाराष्ट्र शासन,**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक - एमआरटी १००७/प्र.क्र.८९/टी-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक :- १ फेब्रुवारी, २००८**

**वाचा :-**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम २००७ (सन २००७ चा क्रमांक २३)

**<u>प्रस्तावना</u> :-**

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण पुनःस्थापित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. सदर निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम २००७ (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २००७ चा २३) हा दिनांक ०६ ऑगस्ट २००७ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. तसेच उक्त सुधारणा अधिनियम दिनांक १३ डिसेंबर २००७ पासून अंमलात आला आहे. परिणामतः महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण दिनांक १३ डिसेंबर २००७ पासून पुनःस्थापित करण्यात आले आहे.

२. यापूर्वी, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण कार्यान्वित असतांना न्यायाधिकरणावरील अध्यक्ष व सदस्य यांना देय असलेल्या मानधनाचे दर शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एमआरटी १०९१/प्र.क्र.३९९/ल-६, दिनांक १५.०१.१९९६ अन्वये निश्चित करण्यात आले होते.

याशिवाय, शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एमआरटी १०७६/१०६३/ल-६, दिनांक ०२.०४.१९७६ अन्वये न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष व सदस्यांना पुढील सवलती अनुज्ञेय करण्यात आल्या होत्या :-

१) दरमहा रु.२५०/- इतका विशेष भत्ता,

२) निवासी दुरध्वनी

३) महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ अनुसार अनुज्ञेय असणाऱ्या वैद्यकीय सवलती.

३. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे काम हे न्यायिकवत आहे व न्यायाधिकरणाने दिलेल्या निवाडयाविरुध्द केवळ उच्च न्यायालयात अपील करता येते. यावरुन न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष व सदस्य यांच्या कामाचे महत्व स्पष्ट होते. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाची पुन्हा नव्याने स्थापना करण्यात येत असल्यामुळे न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष व सदस्य यांच्या प्रचलित सेवाशर्तीमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या अनुषंगाने, उक्त दिनांक ०२.०४.१९७६ व दिनांक १५.०१.१९९६ च्या शासन निर्णयांचे अधिक्रमण करुन शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :-**

***अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण या पदाच्या सेवाशर्ती खालीलप्रमाणे राहतील*** :-

**१) वेतन :-** अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण या पदास प्रतिमाह रु.२६०००/- (नियत) एवढे वेतन अनुज्ञेय राहील. तथापि, या पदावर सेवानिवृत्त झालेल्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती झाल्यास त्यांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा निवृत्ती वेतन) नियम, १९८२ मधील नियम १५७ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

**२) महागाई भत्ता :-** पुनर्नियुक्तीच्या कालावधीत निवृत्ती वेतनावरील महागाई भत्त्याची पूर्ण वित्तलब्धीमधून वजावट करण्यात येईल, या अटीच्या अधीन राहून (Relief on Pension is deducted from emoluments drawn during the period of re-employment) अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या दराने महागाई भत्ता देय राहील.

**३) स्थानिक पूरक भत्ता :-** उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना अनुज्ञेय असलेल्या दराने स्थानिक पूरक भत्ता देय राहील.

**४) घरभाडे भत्ता :-** अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई हे शासकीय निवासस्थानात राहत नसल्यास त्यांना त्यांच्या वेतनाच्या तीस टक्के दराने घरभाडे भत्ता अनुज्ञेय राहील.

**४) अन्य भत्ते :-** अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांना उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना लागू असलेल्या उच्च न्यायालयाचे न्यायाधीश (सेवाशर्ती) अधिनियम, १९५४ व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश (प्रवासभत्ते) नियम १९५६ अनुसार आतिथ्य भत्ता, प्रवास व दैनिक भत्ता व अन्य सेवा सवलती अनुज्ञेय राहतील.

**५) वाहन सुविधा :-** अध्यक्ष महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांना शासकीय व इतर कार्यालयांमध्ये वाहनाच्या वापरासंबंधीच्या राज्य शासनाच्या धोरणानुसार स्टाफ कारची सुविधा अनुज्ञेय राहील.

**६) निवासी दूरध्वनी :-** अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार निवासी दूरध्वनीची सुविधा अनुज्ञेय राहील.

**७) वैद्यकीय सुविधा :-** अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांना अखिल भारतीय सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९५४ अनुसार अनुज्ञेय असणाऱ्या वैद्यकीय सवलती देय राहतील

**८) अवशिष्ठ तरतूद (Residuary provision) :-** अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण या पदाबाबत जर एखादी सेवाशर्त निःसंदिग्धपणे नमूद करण्यात आलेली नसेल तर त्या त्या वेळी भारतीय प्रशासन सेवेतील सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांना लागू असलेल्या तरतूदीनुसार सदर सेवाशर्तीची अनुज्ञेयता ठरविण्यात येईल.

***सदस्य, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण या पदाच्या सेवाशर्ती खालीलप्रमाणे राहतील*** :-

**१) मानधन :-** सदस्य, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांना प्रतिमाह रुपये १५,०००/- एवढे मानधन अनुज्ञेय राहिल.

**२) निवासी दूरध्वनी :-** सदस्य, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार निवासी दूरध्वनीची सुविधा अनुज्ञेय राहील.

**३) वैद्यकीय सुविधा :-** सदस्य, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ अनुसार अनुज्ञेय असणाऱ्या वैद्यकीय सवलती देय राहतील.

२.		हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अ.नौ.सं.क्र. ८/०८/सेवा-६, दिनांक १६.०१.२००८, क्र. ३६/सेवा-५, दिनांक १७.०१.२००८, क्र. ४२/०८/वि.सू., दिनांक २२.०१.२००८, क्र.२९/०८/सेवा-४, दिनांक २३.०१.२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे..

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक **२००८०२०११८००३९००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( नीला सत्यनारायण )**
**अपर मुख्य सचिव (महसूल), महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण द्वारा, विभागीय आयुक्त, कोकण विभाग,
जुने सचिवालय विस्तार इमारत, दुसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई-४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल, (लेखापरिक्षा) - १, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल, (लेखापरिक्षा) - १, महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई **(पत्राने)**
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव व विधी परामर्शी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, (विधी विधान), विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
वित्त विभाग/ सेवा-४, सेवा-५, सेवा-६, व्यय-९ व वित्तीय सुधारणा कार्यासन, मंत्रालय, मुंबई
सामान्य प्रशासन विभाग/कार्यासन क्रमांक १०, मंत्रालय, मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
महसूल व वन विभाग/ ब-१, ई-१ व ल-९ कार्यासने, मंत्रालय, मुंबई
उप प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद व नागपूर खंडपीठ,
निवडनस्ती, टी- १ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकरीता नियुक्त न्यायिक व प्रशासकीय सदस्यांना देय मोबदल्यामध्ये सुधारणा करून वेतन वजा निवृत्तीवेतन या स्वरुपात वेतन निश्चिती करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक - एमआरटी १००७/प्र.क्र. ८९/टी-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १७ मार्च, २०१२.

वाचा :- शासन निर्णय क्रमांक एमआरटी १००७/प्र.क्र.८९/टी-१, दिनांक १ फेब्रुवारी, २००८.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम २००७ (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २००७ चा २३) हा दिनांक ६ ऑगस्ट, २००७ अन्वये दिनांक १३ डिसेंबर, २००७ पासून पुन:स्थापित करण्यात आले. संदर्भाधीन दि. १ फेब्रुवारी, २००८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय व न्यायिक सदस्यांना प्रतिमाह रु.१५,०००/- एवढे मानधन तसेच निवासी दुरध्वनी व महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ अनुसार वैद्यकीय सवलती अनुज्ञेय आहे. तथापि अनुज्ञेय मानधन अल्प असल्याने अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांच्या धर्तीवर मोबदल्यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकरीता नियुक्त न्यायिक व प्रशासकीय सदस्य यांना देय मोबदल्यामध्ये सुधारणा करुन मानधनाऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्ती वेतन) १९८२ मधील नियम १५७ मधील अटींच्या अधीन राहून वेतन वजा निवृत्तीवेतन या स्वरुपात वेतन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. न्यायिक व प्रशासकीय सदस्य, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांना मान्यता देण्यात आलेल्या वेतन वजा निवृत्तीवेतन या स्वरुपात वेतन प्रदान करण्याकरीता वेतन पडताळणी समितीकडून प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांनी वेतन निश्चिती प्राधान्याने करुन घ्यावी. सदर वेतननिश्चिती करीत असतांना महाराष्ट्र नागरी सेवा (सेवानिवृत्ती वेतन) १९८२ मधील नियम १५७ मधील तरतूदींची पूर्तता करण्यासंदर्भात आवश्यक दक्षता घेण्यात यावी.

३. सुधारित वेतन स्वरुपानुसार वेतन पडताळणी समितीने वेतन निश्चित केल्यानंतर आवश्यक रक्कम (तरतूद) मागणी क्रमांक सी-४, २०५२-सचिवालयीन सर्वसाधारण सेवा (०४) (०९९) महसूल



Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

मंडळ, (००) (०१) महसूल मंडळ, (२०५२ ०२२१) या लेखाशीर्षाखाली उपलब्ध करण्यात याव्या. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांनी शासनास तातडीने सूचित करावे.

४. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. ४८/१२/सेवा-४, दिनांक १६ मार्च, २०१२ ला अनुलक्षून निर्गमित करण्यांत येत आहे.

५. सदर शासन निर्णय शासनाच्या अधिकृत वेब साईटवर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१२०३१५१०३०३९३३१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

विद्या हम्पय्या

( विद्या हम्पय्या )

शासनाचे अवर सचिव

प्रत तातडीच्या आवश्यक कार्यवाहीसाठी

- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
- अध्यक्ष, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, जुने सचिवालय विस्तार इमारत, दुसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई-४०० ०३२.
- प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, जुने सचिवालय विस्तार इमारत, दुसरा मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई-४०० ०३२.

प्रत माहितीसाठी :-

- मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
- मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
- मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
- मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
- प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
- प्रधान सचिव (विधी व न्याय), विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
- महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
- महालेखापाल, (लेखापरिक्षा) - १, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
- निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
- प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
- न्यायिक सदस्य महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, पुणे, औरंगाबाद व नागपूर.
- उप प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद, पुणे व नागपूर खंडपीठ
- निवडनस्ती, टी-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र महसूल न्याधिकरणावर नियुक्त करण्यात आलेल्या न्यायिक व प्रशासकीय या पदावरील सदस्यांना विविध भत्ते अनुज्ञेय करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एमआरटी-२०१३/प्र.क्र.२३६/टी-१**

हुतात्मा राजगुरु चौक, मादमा कामा रोड

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**तारीख: ३० मार्च, २०१६.**

**वाचा :-**

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-एमआरटी-१००७/प्र.क्र.८९/टी-१, दि. १.२.२००८.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-एमआरटी-१००७/प्र.क्र.८९/टी-१, दि. १७.३.२०१२.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-सेनिवे-२०१४/प्र.क्र.९९/सेवा-४, दि. १६.१०.२०१४.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकारणावर **सदस्य (न्यायिक / प्रशासकीय) पदावर** नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त मा. न्यायाधिश / प्रशासकीय अधिकाऱ्यांकरीता संदर्भाधीन **क्रमांक १** येथील शासन निर्णयान्वये सेवाशर्ती विहित करण्यात आल्या आहेत. सदर सेवाशर्तीनुसार सदर सदस्यांना **मानधन, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार निवासी दूरध्वनी सुविधा व महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ अनुसार अनुज्ञेय वैद्यकीय सुविधा** देय करण्यात आल्या आहेत.

२. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकारणावर **सदस्य (न्यायिक / प्रशासकीय)** पदावर सेवानिवृत्तीनंतर नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त मा. न्यायाधिश / प्रशासकीय अधिकाऱ्यांकरीता संदर्भाधीन **क्रमांक २** येथील शासन निर्णयान्वये देय मोबदल्यामध्ये सुधारणा करुन त्यांना मानधनाऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ च्या नियम १५७ मधील अटींस अधीन राहून **अंतिम सेवा वेतन वजा निवृत्ती वेतन या स्वरुपात वेतन** देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

३. संदर्भाधीन **क्रमांक ३** येथील वित्त विभागाच्या दि.१६.१०.२०१४ च्या शासन परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या तरतुदींनूसार सेवानिवृत्तीनंतर नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांकरीता **महागाई भत्ता** अनुज्ञेय करण्यात आला आहे.

४. सदर वस्तूस्थितीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र महसूल **न्याधिकरणावर सदस्य (न्यायिक/ प्रशासकीय)** पदावर नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त मा. न्यायाधिश / प्रशासकीय अधिकाऱ्यांकरीता **महागाई भत्ता, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.**

## शासन निर्णयः-

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणावर ***सदस्य (न्यायिक / प्रशासकीय) पदावर*** नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त मा. न्यायाधिश / प्रशासकीय अधिकाऱ्यांना वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.१६.१०.२०१४ च्या परिपत्रकामधील तरतुदींनुसार ***महागाई भत्ता अनुज्ञेय करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.*** *त्याचप्रमाणे,* सदर ***सदस्य (न्यायिक / प्रशासकीय) यांना ते सेवानिवृत्तीच्या वेळी धारण करत असलेल्या पदाकरीता देय असणारा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता विहित नियमांनुसार अनुज्ञेय करण्यासही शासनाची मान्यता देण्यात येत आहे.***

२. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणावर **सदस्य (न्यायिक / प्रशासकीय) पदावर** नियुक्त करण्यात आलेल्या सेवानिवृत्त मा. न्यायाधिश / प्रशासकीय अधिकाऱ्यांना यासंदर्भात राज्य शासनाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश बंधनकारक राहतील.

३. यासंबंधीचा खर्च पुनर्नियुक्त निवृत्तीवेतन धारकाच्या ज्या अर्थसंकल्पीय शिर्षाखाली खर्ची टाकण्यात येतो, त्या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्या-त्या लेखाशिर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदरहू भत्ते या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अनुज्ञेय होतील आणि सदर भत्ते हे संबंधित **सदस्य (न्यायिक / प्रशासकीय)** यांच्या महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणावरील सदस्य पदाच्या नियुक्तीच्या कालावधीकरीताच अनुज्ञेय राहतील.

५. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या **अनौपचारिक संदर्भ क्र.-(१) क्र. २३८/२०१५/व्यय-९, दि.०२.०६.२०१५ व (२) क्र. १२६/१५/सेवा-५, दि.२३/०९/२०१५** द्वारे प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक **२०१६०३२८१२४०४५८६१९** असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

Sharad Madhavrao Doke

Digitally signed by Sharad Madhavrao Doke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SECTION OFFICER, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49a6844e93d7a1180c3226081e6f456ddf8d7b1bc67bc4bd78fa78029ab559db, serialNumber=b6d84b8aafc59276d709cc7218691343d053ce00524eb05a7fb23fbfe5a5b2c6, cn=Sharad Madhavrao Doke
Date: 2016.03.31 13:04:18 +05'30'

**(शरद डोके)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत, आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीकरिता,**

१) अध्यक्ष, महराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, जुने सचिवालय, विस्तार इमारत, मुंबई-३२.
२) न्यायिक व प्रशासकीय सदस्य, महराष्ट्र महसूल न्याधिकरण, मुंबई मुख्यपीठ, मुंबई.
३) न्यायिक व प्रशासकीय सदस्य, महराष्ट्र महसूल न्याधिकरण खंडपीठ, पुणे / औरंगाबाद / नागपूर.
४) प्रबंधक, महराष्ट्र महसूल न्याधिकरण, मुंबई मुख्यपीठ, मुंबई
५) लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई / नागपूर

**प्रत माहितीसाठी,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) प्रधान सचिव (विधी व न्याय), विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) -१ महराष्ट्र , मुंबई/ नागपूर
८) महालेखापाल, (लेखापरिक्षा) -१ महराष्ट्र , मुंबई/ नागपूर
९) निवासीलेखा परिक्षा अधिकारी मुंबई.
१०) प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
११) उपप्रबंधक, महराष्ट्र महसूल न्याधिकरण खंडपीठ, पुणे/औरंगाबाद/ नागपूर.
१२) निवड नस्ती (टी-१) कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई-३२.